


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १९ जून १९४६ अंक २५

श्री—श्री—श्री—श्री—श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

कंपनीनें चार लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी शेअर दर शेअरला रु. ५ प्रिमिअम असे विक्रीस काढले आहेत.

**युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.**

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री—श्री—श्री—श्री—श्री

# विविध माहिती

**कै. शेठ गोविंदराम सेकसरिया**—कै. शेठ गोविंदराम हे मुंबई-चे लक्ष्मीपती नुकतेच निवर्तले. शेअर्स, सोनें, चांदी, कपास, गहूं, साखर, तांबे, इत्यादि अनेक जिनसांच्या बाजारांत जागतिक प्रमाणावर त्यांच्या उलाढाली चालत असत. त्यांनीं सूत, कापड, वनस्पति तेल, खनिज द्रव्यें, इत्यादींच्या कित्येक कंपन्या स्थापन केल्या. स्वतःच्या मारवाडी भाषेखेरीज कोणत्याहि इतर भाषेंत ओळीनें दोन वाक्यें त्यांस बोलतां येत नसत, एवढें त्यांचें "शिक्षण" झालेलें होतें, परंतु तें त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या आड आलें नाहीं. त्यांनी दिलेल्या देणग्यांची रक्कम अनेक कोटि रुपये आहे!

**महाराष्ट्र इंजिनिअरिंग वर्क्स लि., पुणें**—वरील नांवाची इंजिनिअरिंग कंपनी श्री. दा. वा. पोतदार, बी. ई. इलेक्ट्रिकल इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर, ह्यांनीं स्थापन केली असून तिची मॅनेजिंग एजन्सी डी. व्ही. पोतदार आणि कं. कडे आहे. कंपनीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध तज्ज्ञ आर्किटेक्ट व इंजिनिअर प्रो. एन. एस. गुपचूप हे आहेत. डायरेक्टर बोर्डावर श्री. जी. व्ही. साळवेकर. श्री. नानासाहेब पुराणिक, एस. एम. जोशी, एम. एस. पारसे, व्ही. एम. देवल, एम. जे. वैद्य, वगैरे मंडळी आहेत असें समजतें. कंपनी नुकतीच नोंदण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल २५ लक्ष रुपयांचें असून त्यांपैकीं ५ लाखांचे भाग विक्रीस काढण्यांत येतील असें समजतें.

**भाताच्या गिरण्यांतील मजूर**—हिंदुस्थानांत १९४३ सालीं १,६४३ भाताच्या गिरण्या होत्या व त्यांत ५१,३८५ लोक काम करीत होते. ह्या गिरण्यांपैकी निम्म्या गिरण्या एकट्या मद्रास प्रांतांत आहेत. त्याचे खालोखाल बंगाल, मध्यप्रांत, बिहार, ओरिसा आणि मुंबई ह्यांचा अनुक्रम येतो. मद्रासमधील गिरण्यांतील मजुरांपैकी ६४०५% पुरुष व ३३०७% स्त्रिया आहेत. इतर प्रांतांतील गिरण्यांमधील कामगारांत स्त्रियांचें प्रमाण अल्प आहे. मजूरविषयक कायदे भाताच्या गिरण्यांतून क्वचितच पाळले जातात. कामगारांच्या संघटनेचाहि पूर्णपणें अभाव आहे.

**भारत इं. बँक लि.**—वरील बँकेच्या भागीदारांची खास साधारण सभा नुकतीच भरली होती. नव्या कंपनी कायद्याचे कक्षेंत भांडवलाचा आपला सांगाडा आणण्याचे दृष्टीनें आवश्यक ते ठराव सभेनें एकमतानें केले. डिफर्ड शेअर्सचें रूपांतर ऑर्डिनरी भागांत करण्यांत आलें व न विकलेले सर्व प्रेफरन्स भाग रद्द केले गेले. बँकेच्या अधिकृत भांडवलाचा आंकडा त्यामुळें कमी झाला आहे.

**पुणें जिल्हा दुष्काळ निवारण समिति**—वरील समितीकडे एकूण ७,१९३ रुपयांच्या देणग्या आल्या आहेत. त्यांत एन. एम. वाडिया चारिटीज, मुंबई ह्यांचे २,५०० रु. व सकाळ बंगाल फंडाचे १,००० रुपये आहेत.

**अमोनियम सल्फेट**—मुंबई प्रांताच्या तुटीच्या विभागांस अमोनियम सल्फेट पुरविण्याची एक योजना प्रांतिक सरकारनें आंखली आहे. एकूण ७,००० टन खत टनास १६५ रु. ह्या दरानें दिलें जाईल. १५ एकरांस १ टन ह्या हिशेबानें १,३५,००० एकर पिकास खताचा फायदा मिळूं शकेल.








पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें,


















# हिंदी लोकसंख्या आणि अर्थोत्पादन

जगाच्या एकंदर लोकसंख्येंत, दर पांच माणसांत एक हिंदी माणूस असें प्रमाण पडतें. हिंदुस्थानप्रमाणेंच चीनमध्येंही लोकसंख्या भरपूर आहे. या दोन देशांतील अर्थोत्पादन आणि लोकसंख्या यांचें प्रमाण १९ साव्या शतकाच्या उत्तरार्धापासून व्यस्त झालेलें असल्यामुळें इतर कारणांबरोबरच, याही कारणामुळें येथें वारंवार दुष्काळ पडूं लागलेले आहेत. चीनमध्यें तर असें एकही वर्ष जात नाहीं, कीं ज्यांत कोठल्या ना कोठल्या भागांत दुष्काळानें विनी लोकांचे बळी घेतले नाहींत. मुख्यतः शेतकी-प्रधान अशा देशांतील लोकसंख्या झपाट्यानें वाढत असून त्या वाढीमुळें बिकट असे केवळ अर्थशास्त्रीय प्रश्नच उपस्थित होतात असें नव्हे. गौर वर्णीय व तदितर वर्गांचे लोक यांच्यांतील भावी लढ्याचीं चिन्हें विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून तरी स्पष्टपणें दिसूं लागलीं; आणि १९०५ सालीं जपानने रशियाचा पराभव केल्यापासून तर या झगड्याची संभाव्यता पाश्चात्य राजकारणपटूंना अधिकच वाटूं लागली. याचाच अर्थ असा कीं अर्थोत्पादन आणि लोकसंख्या यांच्या परस्परसंबंधांतून या ना त्या प्रकारचें राजकारण उपस्थित झाल्याशिवाय रहात नाहीं. हिटलरने या परिस्थितीचा फायदा घेऊन युरोपमधील देश एकामागून एक घशाखालीं घालण्याचा केलेला उपक्रम निष्फळ झाला असला तरी ही विचारप्रणाली अद्याप बऱ्याच ठिकाणीं मूळ धरून राहिलेली आढळून येते. हिंदुस्थानसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशानें तर या प्रश्नाचा विचार करणें आजच्या परिस्थितींत अत्यंत अगत्याचें झालें आहे.

यासंबंधीं विचार करतांना सहजच असा प्रश्न उपस्थित होतो कीं, हिंदुस्थानांतील लोकसंख्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून भरमसाट वाढण्यास प्रारंभ झाला अशी वस्तुस्थिति आहे कीं काय ? याचें उत्तर होकारार्थी असलें तरी लोकसंख्येच्या वाढीचा अर्थ दोन प्रकारांनीं लक्षांत घेतला पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकसंख्या पूर्वीपेक्षां अधिक होत चालली होती हें तर खरेंच; पण देशांतील अन्न-धान्याच्या पैदाशीच्या प्रमाणाशी तुलना करतांही ती अधिक होऊं लागलेली होती. हिंदुस्थानांत ब्रिटिशांचा अंमल सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थानांतील अर्थोत्पादनांत एक प्रकारचा समतोलपणा होता. देशांतील शेती आणि उद्योगधंदे यांचे एकमेकांशीं असलेले संबंध अंतर्गत मागणी-पुरवठ्याच्या नियमाप्रमाणें आपोआपच सुसूत्र रहात असत. पण ब्रिटिश अंमल देशांत दृढमूल होऊं लागल्यावर हळू हळू जागतिक बाजारपेठांशीं हिंदुस्थानचा संबंध जखडला जाऊं लागला. त्याबरोबर वर सांगितलेला समतोलपणा जाऊन अर्थोत्पादनाला एक अनिष्ट वळण लागलें. अन्नधान्याखालील जमिनीची लागवड कमी प्रमाणांत होऊं लागून, कापूस, ताग, तंबाखू वगैरेसारख्या व्यापारी दृष्टीनें अधिक उपयुक्त अशा वस्तूंची पैदास वाढूं लागली. हा प्रसार अर्थशास्त्रज्ञांच्या व सरकारच्याही लक्षांत आलेला नव्हता असें नाहीं. परंतु अन्नधान्याची पडणारी तूट बाहेरून आयात करून भागवितां येण्यासारखी असल्यानें, त्यासंबंधानें उपाय-योजना करण्यांत आली नाहीं. गेल्या महायुद्धांत बाहेरची आयात बंद झाल्याबरोबर या महत्त्वाच्या प्रश्नाकडे तांतडीनें लक्ष पुरविण्याची जरूरी सरकारला भासूं लागली. आज पिकाच्या पेरणीसंबंधानें सरकारने घालून दिलेले नियम आपल्या परिचयाचे झाले आहेत.

हिंदी लोकसंख्येच्या वाढीचा विचार करतांना अन्नधान्याच्या पैदाशीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली असली तरी संपत्तीच्या विषम वांटणीमुळें लोकसंख्येवर काय परिणाम होतात याकडे अद्याप पुरेसें लक्ष दिलें जात नाहीं. हिंदुस्थानांतील औद्योगिक विकास यापुढें झपाट्यानें होणार असल्यामुळें युरोपांतील औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांत ज्या चुका झाल्या त्या करण्याची खबरदारी देशांतील सरकारने व पुढाऱ्यांनीं घेणें अवश्य आहे. अर्थात् वाढती लोकसंख्या ही धनोत्पादन वाढविण्याची तांत्रिक अनुकूलता असेल तर अनिष्ट गोष्ट नाहीं हें गृहीत धरलेलें आहे. आणि हिंदुस्थानांतील अर्थोत्पादन आजच्या मागासलेल्या साधनांनीहि अधिक वाढवितां येण्यासारखें आहे हें लक्षांत घेऊन औद्योगिक प्रगति करतांनाच संपत्तीच्या वांटपाविषयींही विचार करणें अत्यंत जरूर आहे. या प्रश्नासंबंधीं इंग्लंडमधील प्रागतिक सर विल्यम बेव्हिन यांनीं इंग्लंडपुरता विचार केलेला आहे. त्यांनीं केलेल्या हिशेबाप्रमाणें इंग्लंडमधील अर्थव्यवस्था आहे तशीच पुढें चालू राहिली तर, १९७१ सालीं दर पांच माणसांत एक माणूस वृद्धापकाळचें पेन्शन उपभोगणारा असेल, आणि दर सहा माणसांत फक्त एकच १५ वर्षांखालील मूल असेल. याचा अर्थ असा कीं, १९७१ सालीं इंग्लंडमध्यें धनोत्पादक श्रम करणाऱ्या अगर करूं शकणाऱ्या माणसांची लोकसंख्या कमी होऊन दीर्घायुषी पण बसून खाणाऱ्या लोकांची संख्या वाढणार. ब्रिटनच्या लोकसंख्येंत होणारी घट कशी थांबवावी यासंबंधानें त्या देशांत आतां जोरानें विचार चालू झालेला आहे. जानेवारी १९३९ मध्यें यासंबंधीं सर्वसामान्य जनतेचें मत अजमावण्याचा प्रयत्न करण्यांत आला. या संशोधनांत असें आढळून आलें कीं, पुरेशा उत्पन्नाचा अभाव असल्यामुळेंच बहुतेक पतिपत्नींनीं मुलांची संख्या मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला. इतर कोठल्याही कारणापेक्षां पैशाची दुर्मिळता हें कारण एकास चार या प्रमाणांत देण्यांत आलें. याशिवाय (१) बायकोची अशक्त प्रकृति (२) राहाण्याच्या जागेची अडचण (३) युद्धकालीन टंचाई (४) मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याची जरूरी इत्यादि कारणेंही सांगण्यांत आलीं. कुटुंब मर्यादित ठेवण्याच्या इच्छेला एक कारण फारच अर्थपूर्ण देण्यांत आलें. तें असें— " जगाची आजची परिस्थिति इतकी भयंकर आहे कीं त्यांत मुलांना जन्म देणें फारच धोक्याचें आहे. " इंग्लंड-प्रमाणेंच फ्रान्समधील लोकसंख्याही घटतच चाललेली आहे. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांत आज लोकसंख्येच्याबाबत जे प्रश्न उपस्थित झाले आहेत ते मुख्यतः संपत्तीच्या विषम वांटणीमुळें उत्पन्न झालेले आहेत. हिंदुस्थानांत आज लोकसंख्या भरमसाट वाढलेली दिसत असली तरी ती धनोत्पादनाची तांत्रिक शक्यता उपयोगांत न आणल्यामुळें अधिक वाटत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अजून हिंदुस्थानांत हजारों एकर कसदार जमीन पडिक आहे. ती लागवडीस आणण्याचे प्रयत्न यशस्वी झाले तर लोकसंख्येचा बागुलबोवा वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. पण तसें होण्यापूर्वी संपत्तीच्या उत्पादन-साधनांचा उपयोग सामाजिक गरजा भागविण्याच्या दृष्टीनें करण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. नाहींतर धनोत्पादन वाढून सुद्धां लोकसंख्या फार वाढली ही ओरड कायम राहील आणि युरोप-अमेरिकेंत जी परिस्थिति आज उत्पन्न होऊं पहात आहे तीच आपल्याकडेही होऊन हिंदी लोकांच्या धारणपोषणाचे प्रश्न निष्कारण बिकट होऊन बसतील.

# स्फुट विचार

## मध्यवर्ती सरकार दुर्बल होणार

भारत सेवक समाजाचा ४१ वा वाढदिवस समाजाच्या आश्रमांत ता. १२ रोजीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं सायंकाळीं समाजाच्या निमंत्रित हितर्चिंतकांच्या सभेंत समाजाचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ कुंझरु ह्यांनीं भाषण करून समाजाच्या विविध कार्यांची थोडक्यात माहिती दिली. नंतर त्यांनीं ब्रिटिश मंत्रिशिष्टांच्या योजनेचा थोडक्यांत परामर्श घेतला. संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण व वहातुक एवढींच खातीं नियोजित मध्यवर्ती सरकाराकडे ठेवण्यांत आलीं आहेत, परंतु संरक्षण यशस्वी होण्यास केवळ लष्कर, आरमार व हवाई दल एवढ्याने भागत नाहीं. अनेक आर्थिक घडामोडींचा त्याच्याशीं संबंध येतो, हें पंडितजींनी स्पष्ट केलें. जकाती, व्यापारी करार, चलनव्यवस्था, हुंडणावळ, इत्यादि महत्त्वाच्या बाबींवर मध्यवर्ती सरकारची हुकमत नसेल, तर त्याला परराष्ट्रीय राजकारणांत राष्ट्र म्हणून भाग घेतांच येणार नाहीं. मध्यवर्ती सरकारचें व त्याच्या घटकांचें धोरण ह्यांत वैचित्र्य, विसंगति अथवा विरोध हीं होण्याची शक्यता व भीति नियोजित घटनेंत आजच स्पष्ट दिसत आहे. भारताचें संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण किंवा वहातूक ह्यांसाठीं एखादा कायदा किंवा कर आवश्यक असल्यास मध्यवर्ति सरकारास तो करतां आला पाहिजे आणि त्याच्या घटक सरकारांवर तो बंधनकारक झाला पाहिजे. जरूर ती माहिती गोळा करणें व पहाणी करणें ह्या गोष्टीही मध्यवर्ती सरकारच्या अधिकारक्षेत्रांत रहाणें जरूरीचें आहे. आज जरी मध्यवर्ती सरकार कमकुवत असलें तरी कालांतराने त्याकडे अधिकाधिक सत्ता आपोआप येईल, अशी आशा करण्यास वाव दिसत नाहीं. घटकांनी आपण होऊन एखादें खातें मध्यवर्ती सरकारकडे दिलें तर तें त्याकडे जाणार, एरव्हीं नाहीं; आणि मुस्लिम लीगला प्रस्तुत घटनेच्या अखंड हिंदुस्थानाच्या योजनेंतून पाकिस्तानची प्राप्ति करून घ्यावयाची आहे. अशा परिस्थितींत आर्थिक बाबतींत परावलंबी असलेलें मध्यवर्ती सरकार आपली जबाबदारी पार पाडण्यास समर्थ होणार नाहीं. देवाण-घेवाण करून इतर राष्ट्रांशीं सलोखा निर्माण करण्याचें साधन मध्यवर्ती सरकाराजवळ नसेल, तर त्यास कोणतेंच महत्त्वाचें कार्य करतां येणार नाहीं. मंत्रिशिष्टांच्या योजनेंतील हें वैगुण्य फार मोठें व जाचक ठरणारें आहे.

---

## कॉमनवेल्थ ॲश्युरन्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४५ सालीं ४५ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें. कंपनीस एकूण १५¾ लक्ष रुपयांचें उत्पन्न झालें, त्यांतील १२¾ लक्ष रुपये प्रीमिअमचे होते. एकूण खर्च ५ लक्ष ८८ हजार रु. झाला आणि विमा खातीं फंडांत ९ लक्ष, ६७ हजारांची भर पडली. म्हणजे, आतां विमा खातीं फंड ५६ लक्ष ७२ हजारांचा झाला आहे. व्यवस्थेच्या खर्चाचें रिन्युअल प्रीमियमशीं प्रमाण १३·१% पडलें. हें प्रमाण सालोसाल उतरत चाललें आहे. १९४२ सालीं तें २२·६% होतें. १९४५ सालीं कंपनीकडे ३ लक्ष ४६ हजारांचे क्लेम्स आले व २ लक्ष ४२ हजारांचे क्लेम्स दिले गेले. नॅशनल सेव्हिंग्ज बँकेच्या मुंबई शाखेनें मुंबई हायकोर्टांत कंपनीविरुद्ध ५ लक्ष रुपयांचा नुकसानभरपाईचा दावा लागला होता, तो कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. एस. एम. जोशी ह्यांच्या प्रयत्नांमुळें तडजोड होऊन काढून घेण्यांत आला. ह्याचा गौरवपूर्वक उल्लेख रिपोर्टांत करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें, श्री. जोशी ह्यांनीं क्यु-प्रेफरन्स भागांचें ऑर्डिनरी भागांत रूपांतर करवून घेण्यांतहि अभिनंदनीय यश मिळविलें. ह्या रूपांतरास मान्यता भागीदारांनीं दिली, हें त्यांच्या कृतज्ञतेचें लक्षण आहे आणि त्यामुळें कंपनीची आर्थिक जबाबदारी किती तरी हलकी झाली आहे. विमा कायद्यांत आतां दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे; तिच्या अन्वयें विमा कंपन्यांस फक्त ऑर्डिनरी भागच काढतां यावयाचे आहेत. 'कॉमनवेल्थ' च्या भागीदारांनीं आपल्या डिव्हिडंडचा हक्क आपण होऊन अगोदरच सोडण्यांत औचित्य दाखविलें आहे.

---

## कोल्हापूर समाचार

कोल्हापूर सरकारच्या पब्लिक रिलेशन्स ऑफिसमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या वरील साप्ताहिक समाचारानें दुसऱ्या वर्षांत नुकतेंच पाऊल टाकलें आहे. हें पत्र सरकारी असूनहि त्यांत जिवंतपणा दिसून येतो, हें त्याचें एक वैशिष्ट्य आहे. सुबोध व भारदस्त भाषा, जनतेस उपयुक्त अशा विषयांची चर्चा, वाचकांच्या तक्रारीस देण्यांत येणारें स्थान व त्यांचे गैरसमज दूर करण्यांत घेतलेली दक्षता, वेगवेगळे कायदे व कानू ह्यांचे बोधप्रद गोषवारे, ठिकठिकाणचीं बातमीपत्रें, इत्यादींमुळें कोल्हापूर समाचार करवीरच्या नागरिकांस मार्गदर्शक झालेला आहे. प्रस्तुत पत्र सुरू करण्याचा मूळ उद्देश त्यामुळें सफळ होत आहे. इतर संस्थानांच्या मुखपत्रांस आदर्श होण्याजोगें हें पत्र आहे. त्याचे संपादक श्री. नी. गो. पंडितराव, ह्यांच्या संपादनचातुर्याचा करवीर सरकारास व प्रजेस चांगला उपयोग होत आहे, ही गोष्ट त्यांस अभिमानास्पद आहे.

---

## हिंदुस्थानची अन्नधान्य परिस्थिति

हिंदुस्थानांतील संभाव्य दुष्काळ टाळावयाचा असेल तर परराष्ट्रांतून आयात करणें जरूर असल्याबद्दल एकमत असून त्याप्रमाणें सरकारी प्रयत्न चालू आहेत. वॉशिंग्टनमधील हिंदी प्रतिनिधि डॉ. व्ही. के. राव यांनीं रॉयटर्स वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीजवळ नुकतेच असे उद्गार काढले कीं अमेरिका, कानडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांकडून जून महिन्यांत हिंदुस्थानला २ लक्ष ३२ हजार ४५० टन गहूं अगर तत्सम अन्नधान्य मिळूं शकेल. त्याप्रमाणें आश्वासनहि या देशांकडून मिळालें असल्याचें त्यांनीं सांगितलें. त्यापैकीं ऑस्ट्रेलियाकडून ८४ हजार टन गहूं आणि २६ हजार टन कणीक मिळणार आहे. अमेरिकेच्या शेतकी खात्यानें प्रसिद्ध केलेल्या माहितीप्रमाणें चालू वर्षाच्या जानेवारी ते मेपर्यंत अमेरिकेकडून हिंदुस्थानला फक्त ९९ हजार टन गहूं आयात करण्यांत आला. त्या मानानें पहातां वरील वचन बरेंच उदार आहे यांत शंका नाहीं. पण उक्ति आणि कृति यांत प्रत्यक्ष मेळ किती बसतो त्यावर वचनाची किंमत अवलंबून आहे. धान्य हिंदुस्थानांतील बंदरांत येऊन पोंचेल तेव्हां खरें. मुंबई प्रांताचे पुरवठा मंत्री श्री. दिनकर देसाई यांनीं मुंबई प्रांताची अन्नधान्य परिस्थिति अगदींच असमाधानकारक नाहीं. असें जाहीर केलें आहे. तथापि कडक काटकसर आणि लोकांच्या सहकार्याची आवश्यकता यांची फार जरूर आहे या मुद्यावर त्यांनीं जोर दिला. त्याचप्रमाणें मुंबई प्रांताला अन्नधान्याची जी तूट येईल ती मध्यवर्ती सरकारकडून भरून मिळण्याची बरीच शक्यता आहे ही महत्त्वाची माहितीही त्यांनीं सांगितली. हिंदुस्थान सरकारकडून तसें आश्वासन मिळालें असून या वर्षी जरूर असणारें ४ लाख २५ हजार टन धान्य मिळालें तर मुंबई इलाखा दुष्काळाच्या आपत्तींतून वांचेल. अफगाणिस्थानाकडून ५०० टन अन्नधान्य हिंदुस्थानला मिळणार होतें. त्यापैकीं ७ हजार धान्याचीं पोतीं काबूलहून पेशावरला आलीं आहेत. बंगालमधील तांदुळाचे भाव कडाडत चालल्याच्या वार्ता येत आहेत. मद्रास प्रांतातील दुष्काळ इतर प्रांतांच्या मानानें अधिक तीव्र होणार अशीं चिन्हें दिसत आहेत.

## धर्मांतरामुळें घटस्फोट मागण्यास अधिकार प्राप्त होत नाहीं

### पत्नीचा घटस्फोट मिळविण्यासाठी दावा

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निर्णय

शेबाबा खानूम विरुद्ध खुदादाद बोमनजी इराणी हा दावा न्यायमूर्ति ब्लॉगडेन यांचेपुढें निर्णयासाठी निघाला होता. वादी शाबाबा खानूम हिची मागणी अशी होती कीं तिला घटस्फोट मिळावा किंवा तिचा पति प्रतिवादी खुदादाद बोमनजी हा वादींचा नवा धर्म स्वीकारीत नसल्याकारणानें त्या दोघांचा वैवाहिक संबंध संपला असें जाहीर करण्यांत यावें.

या दाव्यांत उद्भूत झालेला महत्त्वाचा मुद्दा असा होता कीं पतिपत्नींपैकीं कोणीहि एकजण धर्मांतर करून तद्द्वारां स्वतःला लागू होणाऱ्या नव्या परकीय वैयक्तिक कायद्याची सक्ती आपल्या जोडीदारावर त्याची इच्छा नसतांना करूं शकतें काय ?

या दाव्यांतील वादी-प्रतिवादी हे धर्मानें पारशी व वंशानें इराणी असून त्यांचा विवाह वीस वर्षांपूर्वी इराणांत झाला होता. विवाहानंतर ते हिंदुस्थानांत येऊन राहिले व त्यांनीं येथील नागरिकत्वाचे हक्क संपादन केले.

वादी बाईचें वय दावा लावला तेव्हां ३६ वर्षांचें होतें. एप्रिल १९४४ मध्यें त्यांना एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नावरून त्यांनीं मुसलमानी धर्माचा स्वीकार केला व आपल्या पतीसहि मुसलमानी धर्म स्वीकारण्याबाबत आग्रह केला; परंतु प्रतिवादीनें ती गोष्ट नाकबूल केली. त्यावरून बाईनीं वरीलप्रमाणें दावा लावून घटस्फोटाची मागणी केली. मुसलमानी कायद्याप्रमाणें आपणास घटस्फोट मिळविण्याचा अधिकार आहे असें बाईचें म्हणणें होतें.

न्यायमूर्ति आपल्या निर्णयांत म्हणतात कीं, जर मुसलमानी देशांत हा मुद्दा निघाला असता तर या धर्मांतरामुळें विवाहसंबंध तुटले असाच निर्णय द्यावा लागला असता. परंतु ब्रिटिश हिंदुस्थान हा मुस्लिमेतर देश आहे. अशा देशांत एक मुस्लिम व मुस्लिमेतर यांच्या मिश्र विवाहास मुसलमान कायदे प्रवर्तकांनीं कोणत्या कारणांनीं मुसलमानी कायदा लागू करणें युक्त ठरविलें असतें तें समजणें कठीण आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत मुस्लिमेतर प्रजाजनांवर मुस्लिम कायद्याची बजावणी करण्यास कांहींच सयुक्तिक कारण नाहीं असा स्पष्ट निर्णय न्यायमूर्तींनीं दिला आहे. मग अशा प्रसंगीं कोणता कायदा लागू करावा ? असा प्रश्न निघतो. त्यावर जेव्हां दाव्यांतील पक्षकार निरनिराळ्या वैयक्तिक कायद्याचे ( Personal Law ) अनुयायी असतील तेव्हां प्रतिवादीच्या कायद्याचा अंगिकार करावा असा कोर्टानें निर्णय घेतला आहे व तो नवीन नाहीं. त्याला गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट, कलम २२३ चा आधार न्यायमूर्तींनीं दिला आहे. शिवाय असा आधार नसता तरी न्याय, समता व सद्बुद्धि यांच्या विचारानें हाच निर्णय घेणें भाग आहे असें न्यायमूर्तींनीं दाखवून दिलें आहे.

आपद्ग्रस्त स्त्रीस मदत करावी हें स्त्रीदाक्षिण्य खरें परंतु न्यायाधीशाला स्त्रीदाक्षिण्यापेक्षां प्रस्थापित कायद्याची व सर्वसामान्य न्यायबुद्धीची चाड अधिक धरणें भाग आहे. न्यायाधीश जर ही जाणीव ठेवणार नाहीं तर विचित्र प्रकारच्या दाव्यांतील अप्रबुद्ध निर्णयांवरून अहितकारक स्वरूपाच्या पळवाटा तो कायद्यामध्यें काढून देईल. यासाठीं मला वादीचें म्हणणें मान्य करवत नाहीं असें न्यायमूर्तींनीं म्हटलें आहे. या दाव्यांत वादीचें म्हणणें अमान्य करण्यापासून कोणतेंहि विशेष हित साधत नाहीं हें मी जाणतों, परंतु तें मान्य करणें म्हणजे अशा एका घातक तत्त्वास मान्यता देणें आहे कीं ज्यामुळें या देशांतील ख्रिश्चन, पारशी व विशेषतः भोळया बिचाऱ्या हिंदु विवाहित स्त्रिया यांना नसत्या आपत्तींत लोटण्यासारखें आहे. अशा प्रकारचें तत्त्व प्रस्थापित करण्यास मी आपणहून मान्यता देणार नाहीं व कायद्यांतहि त्यांस मान्यता नाहीं; असा स्पष्ट निर्णय न्यायमूर्तींनीं दिला आहे. सारांश केवळ धर्मांतरानें वैवाहिक संबंध संपत नाहींत व घटस्फोट मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं.




दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स


| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. साळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. SC. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स



—: साठे बिस्किटें :—

श्रुसबरी, ऑरेंज, फॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष : श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए. कागदाचे व्यापारी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

**Deccan Institute of Commerce Poona.**

( Recognised by Government ).

Classes for the 1946–47 Session will begin on Monday the 24th June 1946. Students coached up for G.D.C & C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st)., G. D. C. & A., Indian Institute of Bankers, Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, Matriculates and Non-Matriculates. Classes in the morning and evening. Prospectus free on application to:

257, C, Budhwar Peth, (Main Road). Opp. Pharaskhana Haud, Poona City. — Secretary.

—दररोज वापरण्यासाठीं लागणारें—

लोणी आणि चक्का

खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील

—प्रमुख ठिकाण—

बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.

# मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

सिंप्लेक्स रु. ९ दि. ४-७-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ११।६।४६ | बुधवार १२।६।४६ | गुरुवार १३।६।४६ | शुक्रवार १४।६।४६ | सोमवार १७।६।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | ३१०७-८ | | ३१०८-१२ | ३१७७-८ |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५५६-० | | ५५६-० | ५६७-० |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | २५८२-८ | | २५७७-८ | २६१७-८ |
| ७०२; ५६६ | १९-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ९६३-० | | ९४९-० | ९६८-० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ८४१-० | | ८३९-० | ८७१-० |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | | ४६६-० | | ४६५-० | ४७८-८ |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | ४६७-० | | ४६३-८ | ४७४-० |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ३९६-० | | ३९३-८ | ४०५-० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | —बाजार बंद— | ४४१-० | —बाजार बंद— | ४३८-८ | ४५०-० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ५-७-० | | ५-७-० | ५-९-६ |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | २२-५-० | | २२-३ | २२-१५ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | | ४-७-० | | ४-६ | ४-८-६ |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ९५७-८-० | | ९५०-० | १००२-८ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २६०-० | | २६०-० | २६३-८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | ३२६-० | | ३३१-८ | ३४१-० |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ६९६-४ | | ७३२-८ | ७८५-० |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ५३-८ | | ५५-० | ५८-१० |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०४-०-० | | १०४-२ | १०४-२ |

सोमवार दि. १७-६-४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१-४ | बरोडा | २२०-० | आंध्रा व्हॅली | ११६२-८ | अलकॉक | ७००-० |
| १९५१-५४ | १०३-५ | सेंट्रल | १४७-४ | बॉम्बे ट्रॅम | १६०-८ | बॉंबे स्टीम | ८४५-० |
| १९५७ | १०३-१० | इंडिया | २७४-० | टाटा हायड्रो. | २३६-० | न्यू इंडिया | १२६-४ |
| १९५९-६१ | १०३-१० | इंपी० | ३१३०-० | टाटा पॉवर | २१२५-० | शिवराजपुर | ५९-० |
| १९६३-६५ | १०४-० | | ८३५-० | | | टाटा केमिकल | २८-८ |
| १९६६-६८ | १०४-० | रिझर्व्ह | १७१-८ | | | टाटा ऑईल | १३२-० |
| १९७०-७५ | १०४-३ | युनियन | २०-० | | | | |




## प्रिन्सिपॉल कर्वे यांचा विमानाचा प्रवास

पुणें येथील व्यापारी कॉलेजचे प्रिन्सिपाल डी. जी. कर्वे हे युनिव्हर्सिटीचे जरूरीचे कामाकरितां गेल्या आठवड्यांत विमानानें कराचीस गेले होते. त्यांचें विमान हें एकवीस माणसांचें असून सर्व सोईनीं युक्त असें होतें. ते मुंबईमार्गें गेले होते. कराचीस जाण्याकरितां अवघा चार तासांचा वेळ लागतो, असें त्यांनीं सांगितलें. प्रवासाच्या इतर थोड्या गमती पण सांगितल्या. त्यांचा हा विमानाचा पहिलाच प्रवास होय.

---

सहकारी शेती—सहकारी शेती मुंबई प्रांतांत सुरू करण्याच्या शक्यतेचा विचार करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत येणार आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# तोच सुदिन

कीं

ज्या दिवशीं भारतावर

स्वातंत्र्यसूर्य चमकेल

पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल।

याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्यकर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी

येथील सुप्रसिद्ध

# कॉमनवेल्थ

## विमा कंपनी लि.,

येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.

एजन्सीसाठीं आजच लिहा अगर भेटा

ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष

व एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर

महाराष्ट्र शारदेची तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

## पैसा व ज्ञान मिळवा !

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा। किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील। किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल। किं. १ रु.—चारीं पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ।

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

# बिनचूकच्या माहितीनें


स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
——:इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत :——

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.